MHAU060013702021

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | : १५.०९.२०२१ |
| नोंदणी दिनांक | : १६.०९.२०२१ |
| निकाल दिनांक | : २८.०७.२०२२ |
| कालावधी | : वर्ष महिने दिवस<br>०० १० १३ |

**कन्नड येथील सह दिवाणी न्यायाधीश क . स्तर (न्यायालय क्र.१), ता. कन्नड, जि.औरंगाबाद यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी प्र. मा. कोळसे)**

**नियमीत दिवाणी दावा क्र. १८१/२०२१**
**निशाणी. क्र.२०.**

**राजेंद्र बाबु राठोड.**
वयः– ४३ वर्ष, धंदा–शेती/नोकरी,
रा.– मु. तळोंदे प्र.चा., पो. लोणजे,
ता. चाळीसगांव, जि. जळगांव. **...वादी**

**विरुध्द**

१. **शिवलाल जानु चव्हाण.**
वय ४६ वर्षे, धंदा – शेती,
२. **वर्षीबाई शिवलाल चव्हाण.**
वय – ४३ वर्षे, धंदा – शेती,
३. **भंगी शिवलाल चव्हाण.**
वय २४ वर्षे, धंदा – शेती,
४. **सचिन शिवलाल चव्हाण.**
वय २१ वर्षे, धंदा – शेती,

सर्व रा. मु. बोपेवाडी नागदतांडा, पो.नागद,
ता. कन्नड,जि. औरंगाबाद. **...प्रतिवादी**

**दावा निरंतर मनाई हुकूमासाठी**

---

**सहभागः–**

वादी पक्षातर्फे विधिज्ञ – श्री. ए. आर. जाधव.
प्रतिवादी तर्फे – एकतर्फा

---

**न्यायनिर्णय**
**(जाहीर दिनांक २८ जुलै, २०२२)**

**१.** वादीने सदर दावा प्रतिवादींविरुध्द त्याचे दावा मिळकतीत कब्जे उपभोगास तसेच वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे.

**२. मिळकतीचे वर्णन,**

गाव मौजे बोपेवाडी शिवारातील शेतजमीन, ता. कन्नड येथील शेतजमीन गट क्रं. १०२, क्षेत्र ३ हे ११ आर + पोट खराब – ० हे ०५ आर एकुण क्षेत्र ३ हे १६ आर, आकार रुपये ४ रुपये १० पैसे यापैकी वादीच्या हिश्याची ० हे ८० आर जमीन याच गटात असलेल्या विहीरीतील ८ आण्याचा हिस्सा व हक्कासह तिच्या चतुःसिमा पुढील प्रमाणे.

पुर्वेस – नाला.
पश्चिमेस – पश्चिमेस रस्ता.
दक्षिणेस – प्रतिवादी यांची शिल्लक जमीन.
उत्तरेस – तुळशिराम छगन चव्हाण याची जमीन.

**३.** वादीचे थोडक्यात कथन असे की, दावा मिळकत वादीने प्रतिवादीकडुन कायम खरेदीखताने दि.०५.१०.२०१८ रोजी घेतलेली होती व आहे. सदर खरेदीखतापासुन आजपावेतो सदर मिळकत वादी आपल्या प्रत्यक्ष कब्जेत उपभोगात घेवुन वहिवाटीत होता व आहे. यावर्षी वादीने शेतामध्ये कपाशीचे पिक लावलेले असुन ७/१२ सदरील वादीच्या

नावाचा पिकपेरा लागलेला आहे असे असतांना जुन २०२१ मध्ये वादी सदर मिळकतीत कपाशीच्या पिकाला रासायनिक खते व फवारणी करुन योग्य काळजी घेत व आहे. तसेच दिनांक २८.०८.२०२१ रोजी वादी याने प्रकाश झामु व छगन चत्तसिंग चव्हाण या मजुरांकरवी पिकास कापसाच्या पिकास फवारणी साठी पाठविले असता वादीच्या स्वतःच्या शेताच्या विहीरीतुन पाणी घेण्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा केला. तसेच प्रतिवादींनी वादीच्या मजुरांना कापसाच्या पिकास फवारणीस अडथळा केला. वादीच्या मजुरांनी प्रतिवादींना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादींनी आरेरावीची भाषा करुन तुम्ही परत या शेतात पाय ठेवला तर तुमचे हातपाय तोडुन टाकु अशी धमकी दिली. सदर बाब वादीच्या मजुरांनी त्याच दिवशी वादीस सांगितली.

४. त्यानंतर दुस–या दिवशी दि. २९.०८.२०२१ रोजी वादी स्वतः व मलखान छगन पवार हे सदर मिळकतीत कपाशी पिकाची पहाणी करण्यासाठी आले असता तेथे शेजारील मिळकतीत प्रतिवादीने वादी यास येवुन धमकी दिली की, 'हे शेत आम्हाला आता परत देवुन टाक, नाही दिले तर तुझ्याविरुध्द खोटयानाटया केसेस दाखल करु, तसेच सदर शेत मिळकतीत लागवड केलेल्या तुझ्या कपाशी पिकाचे नुकसान करु' अशी धमकी दिली. तसेच सदर मिळकतीत वादीचे असलेले पत्र्याचे शेड व त्यातील शेतीची अवजारे यांची प्रतिवादीनी मोडतोड करुन नुकसान केले त्यामध्ये वादीचे अपरिमित असे नुकसान झालेले आहे. वादीने प्रतिवादींना समजावण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादींनी वादीस धक्काबुक्की करु लागले व म्हणाले की, 'तुझा माज उतरावा लागेल', असे म्हणुन सर्व प्रतिवादींनी वादस धक्काबुक्की करुन अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी वादीबरोबर असलेले मलखान वार यांनी प्रतिवादींच्या तावडीतुन वादीची सुटका केली. प्रतिवादींनी वादीच्या मिळकतीत लावलेले काही भागाचे कापसाचे पिक उपट्न टाकले व वादीला दम दिला की, 'तु जर आमच्या विरुध्द जाशील तर आम्ही तुझे पिक येवु देणार नाही, आज थोडा कापुस उपटला आहे, आम्ही तुझे संपुर्ण कापासाचे पिक उपट्न फेकुन देवु' असा दम दिला व शेतातुन धक्काबुक्की करुन शेतातुन हाकलुन दिले.

५. वादीने घटनेबाबत पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेला असता पोलीसांनी दिवाणी स्वरुपाचा वाद असल्याने न्यायालयात जाण्याची समज दिली. अशा प्रकारे प्रतिवादी सदर दावा मिळकतीच्या कब्जे उपभोगास व वहिवाटीस हरकत अडथळा करीत राहिल्यास

वादीने सदर मिळकतीत पेरलेले पिक येणार नाही त्यामुळे वादीचे कधीही न भरुन येणारे अपरिमीत असे नुकसान होईल त्यामुळे वादीने सदर दावा निरंतर मनाईहुकूमासाठी दाखल केलेला आहे.

६. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दाव्याच्या समन्स घेण्यास नकार दिला. त्यामुळे निशाणी १ वरील आदेशानुसार त्यांच्याविरुध्द दाव्याचे कामकाज एकतर्फा चालवितण्यात आले.

७. सदर दाव्याचे अवलोकन केले असता पुढील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष कारणासहित खालील प्रमाणे नोंदवत आहेः–

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | वादीने दावा मिळकत त्याच्या ताब्यात असल्याचे शाबीत केले आहे काय ? | ... **होकारार्थी** |
| **२.** | प्रतिवादींनी वादीच्या कब्जे उपभोगास हरकत अडथळा केल्याचे वादीने शाबीत केले आहे काय ? | ... **होकारार्थी** |
| **३.** | दाव्यात मागणी केल्याप्रमाणे कायमस्वरुपी मनाईहुकूम मिळण्यास वादी पात्र आहे काय ? | ... **होकारार्थी** |
| **४.** | अंतिम आदेश व हुकूमनामा काय ? | ... **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

८. वादीने सदर दाव्याच्या पृष्टयार्थ त्याचे स्वतःचे सरतपासणी शपथपत्र निशाणी क्र. १४ वर दाखल केलेले आहे. तसेच साक्षीदार क्र. २ प्रकाश झामु जाधव यांचे सरतपासणी शपथपत्र निशाणी १८ वर दाखल केलेले आहे. सदर तोंडी पुराव्या व्यतिरिक्त वादीने पुढील कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली आहे.

९. (१) गट क्रं. १०२ चा ७/१२ उतारा निशाणी २०, (२) खरेदीखत दस्त क्रं. ४७२९/२०१८ ची मुळ प्रत निशाणी १६, (३) उत्कर्षा कृषी सेवा केंद्र लोंजे यांच्याकडुन

घेतलेल्या बि–बीयनांची मुळ पावती निशाणी १७, (४) वादीने पुरावा बंद केल्याची पुरशिस निशाणी १९.

**१०.** प्रतिवादीने त्यांना वारंवार संधी देउनही कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा सादर केला नाही. त्यामुळे निशाणी १ वरील आदेशानुसार प्रतिवादींचा पुरावा बंद केला.

**११.** वादीतर्फे श्री. ए. आर जाधव वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबतः–**

**१२.** वादीने त्याच्या सरतपासणीच्या प्रतिज्ञापत्रात त्याच्या दाव्यातील कथनांचा पुनर्वउल्लेख केलेला आहे. वादीने दावा मिळकत प्रतिवादी कडुन नोंदणीकृत खरेदीखताने दिनांक ०५.१०.२०१८ रोजी खरेदी केल्याचे कथन केलेले आहे त्याबाबत वादीने नि.क्र. १६ वर मुळ खरेदीखताचा दस्त क्रं. ४७२९/२०१८ दाखल केलेला आहे. सदर खरेदीखताचे अवलोकन केले असता सदर खरेदीखत नोंदणीकृत असुन प्रतिवादी क्रं. १ याने गट क्रं. १०२ क्षेत्रफळ ३ हे १६ आर यापैकी त्याच्या नावावर असलेली जमीन क्षेत्र १ हे ५६ आर पैकी ०० हे ८० आर जमीन दाव्यात नमुद चतुसिमेनुसार दिनांक ०५.१०.२०१८ रोजी रक्कम रुपये १२,५४,०००/– च्या मोबदल्यात साक्षीदारांसमक्ष खरेदी दिलेली आहे. सदर खरेदीखतातील मजकुरानुसार प्रतिवादी क्रं. १ याने सदर खरेदी दिलेल्या जमीनीचा म्हणजेच वाद मिळकतीचा ताबा वादीस दिलेला आहे. सदर खरेदीखतानुसार वादीचे नांव दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी लागलेले असुन त्याबाबत वादीने दावा मिळकतीचा ७/१२ उतारा नि.क्रं. १५ दाखल केलेला आहे. सदर ७/१२ उता–याचे अवलोकन कले असता त्यावर वादीचे नांव फेरफार क्रं. १७८२ नुसार ८० आर क्षेत्रास लावण्यात आलेले आहे. सदर खरेदीखत व ७/१२ चा पुरावा तसेच वादीचा तोंडी पुरावा प्रतिवादी त्यांना संधी असुनही त्यांना आव्हानीत केलेले नाही त्यामुळे सदर पुरावा विनाआव्हीनीत राहिलेला आहे. सदर पुराव्यावरुन दावा मिळकत ही वादीच्या मालकी व ताबेवहिवाटीस असल्याचे शाबीत झालेले आहे.

**१३.** वादीने त्याच्या जमीन दावा दाखल करतेवेळी कापसाचे पिक घेतल्याचे कथन केलेले आहे व सदर पिकास तसेच वादीच्या दावा मिळकतीती वहिवाटीस प्रतिवादींनी हरकत

अडथळा केल्याचे कथन केलेले आहे. नि.क्रं. १५ वरील ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता त्यामध्ये पिकाच्या नोंदीमध्ये कापुस, ज्वारी व मका या पिकाची नोंद केल्याचे दिसुन येते. सदर पिकांची नोंद सन २०१६ ते २०१९ या हंगामातील आहे. त्यामध्ये सन २०२०–२०२१ या हंगामाचा उल्लेख नाही. त्यामुळे दावा मिळकतीत सदर दावा दाखल करतेवेळी कापुस पिकाची लागवड केलेली होती असा अनुमान ७/१२ उता–यावरुन काढता येणार नाही. परंतु वादीने दावा मिळकतीत कापुस पिकाची लागवड करण्यासाठी उत्कर्षा कृषी सेवा केंद्र लोंजे याठिकाणाहुन घेतलेल्या बियाणांची पावती नि.क्रं. १७ वर दाखल केलेली आहे. सदर पावती दि.२०.०६.२०२१ रोजीची आहे. तसेच वादीने तपासलेले सा.क्रं. २ प्रकाश जाधव याने तो वादीच्या जमीनीत असलेल्या कापसाच्या पिकास फवारणीच्या कामासाठी गेल्याचे नमुद केलेले आहे व प्रतिवादीने त्यांना हरकत अडथळा केल्याचे देखील नमुद केलेले आहे. सदर पुरावा विनाआव्हानीत राहिलेला आहे. त्यामुळे दावा मिळकतीत दावा दाखल करतवेळी कापसाचे पिक होते ही बाब शाबीत होते.

**१४.** वादीने त्यास प्रतिवादींनी दि.२८.०८.२०२१ व दि.२९.०८.२०२१ त्याच्या दावा मिळकतीतील कब्जे व उपभोगास हरकत अडथळा केला असे कथन केलेले आहे. वादीने सादर केलेला स्वतःचा तोंडी पुरावा व सा.क्रं. २ प्रकाश जाधव यांचा तोंडी पुरावा प्रतिवादींनी संधी असुनही आव्हानीत केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीतील ताबेवहिवाटीस हरकत अडथळा केला ही बाब शाबीत झालेली आहे.

**१५.** वादीने दावा मिळकत त्याच्या ताब्यात असुन त्याच्या दावा मिळकतीतील ताबेवहिवाटीस व पिकास प्रतिवादींनी हरकत अडथळा केला ही बाब शाबीत केलेली आहे. त्यामुळे दाव्यात मागणी केल्याप्रमाणे निरंतर मनाई हुकूम मिळण्यास वादी पात्र आहे. करीता मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित असुन मुद्दा क्र. ४ करीता पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** वादीचा दावा खर्चासह मंजुर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीतील कब्जे उपभोगास कोणत्याही प्रकारे हरकत

अडथळा करु नये असा निरंतर मनाई हुकुम देण्यात येतो.

३. येणे प्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर)

Digitally signed by PRAMOD MANIK KOLSE
Date: 2022.07.29 11:57:35 +0530

(प्र. मा. कोळसे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.१), कन्नड.

दिनांक- २८.०७.२०२२

**प्रमाणपत्र**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – यो. सु. माळी.

न्यायालयाचे नांव – प्रमोद मा. कोळसे.
दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),
तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड.

श्रुतलेखन दिल्याचा दिनांक – २८.०७.२०२२

न्यायिक अधिका–यांनी –
निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक– २८.०७.२०२२

निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक – २९.०७.२०२२

..............................................................